गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२०

अधिसूचना

क्रमांक : ३४/२०२० दिनांक : १२/३/२०२०

विषय : वार्षिकांक स्पर्धा २०१८-१९ पारितोषिकांची घोषणा

सर्व संबंधितांना माहितीकरिता कळविण्यात येते की, २०१८-१९ या सत्राकरिता आयोजित केलेल्या वार्षिकांक स्पर्धेत खाली नमूद केलेले वार्षिकांक पारितोषिक विजेते म्हणून घोषित करण्यात येत आहे.

क्रमांक	महाविद्यालयाचे नांव	वार्षिकांकाचे नांव
अ) शहरी विभाग	**: बिगर व्यावसायिक गट**	
प्रथम क्रमांक	भारतीय महाविद्यालय, अमरावती	भारती
व्दितीय क्रमांक	विद्याभारती महाविद्यालय, अमरावती	प्रतिभा
तृतीय क्रमांक	महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, पार्वती नगर, अमरावती	कस्तुरी
ब) शहरी विभाग	**: व्यावसायिक गट**	
प्रथम क्रमांक	श्री.ह.व्या.प्र.मं. चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती	Techno Wings-2019
व्दितीय क्रमांक	प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा	Techno-Stream 2019
तृतीय क्रमांक	सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती	INNOVATOR 2019
क) ग्रामीण विभाग	**: बिगर व्यावसायिक गट**	
प्रथम क्रमांक	स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, साखरखेर्डा	मुक्तरंग
व्दितीय क्रमांक	फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद	कल्पना
तृतीय क्रमांक	कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब	अंतरंग
ड) ग्रामीण विभाग	**: व्यावसायिक गट**	
प्रथम क्रमांक	पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती	Potential २०१८-१९

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

अधिसूचना

क्र. ३५/२०२० दिनांक : १२/३/२०२०

विषय : विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विज्ञान विषय समुहातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना (M.Sc.) लागु करण्यात आलेल्या, पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दतीच्या (Choice Based Credit System(CBCS)) सुविधेबाबत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येऊन त्यासंदर्भात विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणेबाबत.

सर्वसंबंधितांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, विद्यापिठाने यापुर्वी निदेश क्र. २६/२०१० नुसार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील विज्ञान विषय समुहातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना (**M.Sc.**) पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती (Choice Based Credit System(CBCS)) लागु केलेली आहे. उक्त पध्दतीनुसार विद्यार्थ्यांना संबंधित **पदव्युत्तर विषयांसोबतच** त्यांचे आवडीनुसार यापुर्वीच्या म्हणजे विज्ञान विद्याशाखेतील आणि विद्यमान विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील विज्ञान विषय समुहातील विषयाची निवड करण्याची व अतिरिक्त श्रेयांक गुण (Credits) प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विद्यापिठाने निर्गमित केलेला उक्त निदेश संबंधित विषयांच्या प्रत्येक अभ्यासक्रमिकेमध्ये मार्गदर्शनार्थ उपलब्धही करून देण्यात आलेला आहे.

तथापि असे निदर्शनास येते की, विज्ञान विषय समुहाच्या **पदव्युत्तर** अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, संबंधित महाविद्यालयांकडून उपरोल्लेखित सुविधेचा लाभ घेण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येत नाही किंवा प्रोत्साहीत करण्यात येत नाही त्यामुळे उक्त सुविधेपासून विद्यार्थी वंचीत राहतात. तेव्हा सर्वसंबंधितांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, विज्ञान विषय समुहातील पदव्युत्तर विषयांना लागु करण्यात आलेल्या, पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दतीच्या (Choice Based Credit System (CBCS)) उपलब्ध सुविधेबाबत संबंधित महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना आवश्यकते मार्गदर्शन करण्यात येऊन त्यासंदर्भात विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात यावे व त्याअनुषंगाने उक्त निदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

स्वा/-
(डॉ. टि. आर. देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****